**दिनांक ०६/०८/२०१९ कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीची २५ वी टिपणी**
**मा. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली, विभागीय आयुक्त यांचे कार्यालय कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.**

**१.मागिल बैठकीचा आढावा.**

| अ.क्र | विषय | झालेली चर्चा व घेण्यात आलेला निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | श्री. नंदकुमार पवार<br>1) Dastan phata jasai, where almost 100 acres of wetland is reclaimed, Reclamation still continue. | • या तक्रारी संदर्भात SDO पनवेल यांनी दस्तान फाटा शिवस्मारकाचे काम चालू होते ते पूर्ण झाले असून पाणथळ असलेल्या १३१ जागेची यादी नुसार दस्तान फाटा हे क्षेत्र पाणथळ नसल्याचे त्यांनी सांगितले.<br>• उर्वरीत उरण येथील पाणथळाचे संरक्षण करण्यासाठी १३१ जागेची माहिती समितीस तहसिलदार उरण यांना दिलेली आहे. त्यानुसार १३१ पाणथळ जागेचे संरक्षण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी रायगड व तहसिलदार उरण |
| २ | श्री. सुनिल अगरवाल<br>Destruction of Uran wetlands & Mangroves - Dastaan Node. | | |
| ३ | श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाश करुन,सीआरझेड,इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव-बांधकामा प्रकरणी. | • सदर जागेवरील भराव काढण्यासाठी समितीने उपस्थित सहा. आयुक्त वसई-विरार महानगरपालिका यांना दिल्या व सदर जागेचे Restoration करण्याची कार्यवाही करण्याकरीता लागणाऱ्या अनुदानाची शासनाकडून मागणी करावी. | तहसिलदार वसई (जिल्हाधिकारी पालघर) |
| ४ | श्री. धिरज परब:- भाईंदर पूर्व, जेसलपार्क येथे वसई खाडी किनारी कांदळवन, पाणथळ, सीआरझेड १ मध्ये मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी, रॅम्प व पालिकेने रस्ता बांधकामे केले बाबत. | • या तक्रारीबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि.५.११.२०१८ रोजीच्या अहवालानुसार भाईंदर पुर्व भगातून जेसल पार्क रेल्वे समांतर नाला असून सदर नाला हा पुर्वीपासून अस्तीत्वात आहे सदर ठिकाणी नाल्यावर असलेले अडथळे काढून टाकण्यात आले आहेत तसेच नाले पक्या स्वरुपात बांधण्यात आलेले आहे.<br>• तसेच या तक्रारी संदर्भात ५ गुन्हे देखील दाखल केलेले आहेत. | तहसिलदार ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | श्री. धिरज परब: - जेसलपार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिके कडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास | • मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी बांधकाम सर्व परवानग्या घेऊन करण्यात आले आहे असे उप आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी सांगितले.<br>• तसेच तहलिसदार ठाणे यांनी दिलेल्या Geo-Coordinates ची MRSAC वेबसाईद्वारा तपासणी केली असता सदर क्षेत्र हे वेटलॅन्ड यादीतील क्षेत्र नसल्याचे दिसते.<br>• तसेच श्री. धिरज परब यांच्या तक्रारींबाबत उप समितीच्या स्थळ पाहणीचा Part २ अहवाल अद्याप प्रलंबित असल्याने तहसिलदार ठाणे यांनी पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करु असे सांगितले. | |
| ६ | श्री. स्टॅलीन डी –दि.३१.०१.२०१९ Please act to stop illegal destruction of wetlands In Wadala /nearby areas | • या तक्रारी संदर्भात समितीने जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या दि.२५.०४.२०१९ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार सदर जागा वडाला रोडच्या कडेला तसेच भक्ती पार्क मोनोरेल स्टेशन खालून जाणाऱ्या रोडच्या दोन्ही बाजूस ठिक ठिकाणी दगड, माती, रॅबीटचे ढिग आढळून आले. सदर ढिग रस्त्याच्या कडेला असून त्याला लागून कांदळवन आहे. प्रत्यक्ष कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून येत नाही.<br>• सदर जागेवर स्लम (झोपडया) असल्यामुळे समितीने वन अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, मध्यमुंबई व मुंबई पोलिस अधिकारी यांच्या मदतीने योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| ७ | Well Wisher and Environment activist दि.२५.०३.२०१९ Dumping of C & D Waste, Cutting of Mangroves and Destruction of the Wetland in Village Kasheli Tal. Bhiwandi Dis. Thane. | • तहसिलदार ठाणे यांनी तक्रार मिळाली नाही असे सांगितले, त्या अनुषंगाने समितीने सदर तक्रार पुन्हा जिल्हाधिकारी ठाणे यांना पाठविण्यास समितीने सदस्य सचिवांना सांगितले.<br>• तथापि सदर तक्रारीबाबत तात्काळ कार्यवाही करुन ७ दिवसात अहवाल सादर करावा अशा सूचना देण्यात आल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |
| ८ | श्री. स्टॅलिन डी दि.१८.०३.२०१९ Continous reclamation and construction on Wetlands at Bhayanderpada Ghodbunder road by squarefeet Group. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार ठाणे यांनी तक्रारदार श्री. स्टॅलिन डी यांच्या सोबत सदर जागेची स्थळ पाहणी पुढील आठवडयात करण्याचे ठरविले होते.<br>• त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत तक्रारदार यांच्या सोबत स्थळ पाहणी करुन कार्यवाहीचा अहवाल सदस्य सचिवांकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | श्री. सुनिल अगरवाल व<br>श्री. स्टॅलिन डी. २४.०३.२०१९<br>Drying up of Panje Wetland in Uran & debris dumping in Bhenkhal<br>Wetland atlas नुसार पाणजे वेटलँड हे वेटलॅन्ड क्षेत्र नाही. | • या तक्रारी संदर्भात सदस्य सचिवांनी MRSAC नकाशाच्या पाहणी नुसार बेनखल येथे पाणथळ असल्याचे सांगितले.<br>• सदर ठिकाणी मोठया प्रमाणात डेब्रिज भराव होत असल्यामुळे समितीने जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनिधींना तेथील भराव थांबविण्याच्या हटविण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>• तसेच SDO पनवेल यांनी सदर जागेवरील रेक्लमेशन थांबवण्यात आले आहे असे सांगितले.<br>• सिडको यांना डेब्रिस काढण्याची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात यावे असे बैठकित निर्देश देण्यात आले. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको |
| १० | श्री. स्टॅलिन डी :- दि.२७.०६.२०१९<br>Destruction of Wetland by CIDCO | • समितीने ही तक्रार सिडको यांना पाठविण्यात आली आहे. त्यानुसार सिडको यांचे प्रतिनिधी उपस्थित नसल्यामुळे पुढील बैठकीमध्ये सिडको यांना या तक्रारीबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको |